MHAU060002502023

# नियमित दिवाणी दावा क्र. ९४/२०२३ मधील नि.क्र. २८ खालील आदेश

प्रस्तुत अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १५१ अन्वये दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे. वादीचे कथन की, सदरील प्रकरणात दाव्याचे परिच्छेद क्रं. ६ मध्ये ओळ क्रं. ४ मध्ये खरेदीखत नं. २०२९/ नंतर '९८' दि.३०.०६ नंतर '१९८८' असे टाईप झालेले आहे. परंतु त्याठिकाणी ९८ ऐवजी ८८ व १९९८ ऐवजी १९८८ अशी दुरुस्ती करणे जरुरीचे झाले आहे. सदरील चुक ही टायपिंगची व नजर चुकीने अनावधानाने झालेली आहे. हेतुपुरस्कर सदरील चुक झालेली नाही. सदरील चुक दुरुस्त करणे न्यायाचे दृष्टीने न्याययोग्य होईल. सदरील दुरुस्ती टायपिंगची असल्याने दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होत नाही. सदरील टायपिंगची झालेली चुक दुरुस्तीची परवानगी मिळाली नाही. तर वादी ही हक्कापासुन वंचित होऊन कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. त्यामुळे सदर अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

२. सदर अर्जास प्रतिवादी यांनी नि.क्र.३१ वर म्हणणे दाखल करुन हरकत घेतली की, सदर अर्ज हा कायदेशिर नसुन नामंजुर होण्यास पात्र आहे. वादी हे स्वच्छ हाताने न्यायालयासमक्ष आलेले नाहीत. सदर अर्जामध्ये वादीने सुचवलेल्या दुरुस्तीबाबत तसेच टंकलेखकाच्या चुकीबाबत कोणतेही संयुक्तीक कारण दिलेले नाही. त्यामुळे सदर अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली.

३. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. युक्तीवाद ऐकला.

४. वादीने सदर दावा वाटणी करुन १/३ हिश्याचा वेगळा प्रत्यक्ष ताबा मिळण्याबाबत दाखल केलेला आहे. वादीच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार दावा दाखल करतेवेळी प्रकरणात दाव्याचे परिच्छेद क्रं. ६ मध्ये ओळ क्रं. ४ मध्ये खरेदीखत नं. २०२९/ नंतर '९८' दि.३०.०६ नंतर '१९८८' असे टाईप झालेले आहे. परंतु त्याठिकाणी ९८ ऐवजी ८८ व १९९८ ऐवजी १९८८ अशी दुरुस्ती करणे जरुरीचे झाले आहे. सदरील चुक ही टायपिंगची व नजर चुकीने अनावधानाने झालेली आहे. सदर चुक ही हेतुपुरस्कर नसुन टंकलेखकाच्या चुकीमुळे झाल्याची बाब नाकारता येत नाही. सदर दुरुस्तीचे स्वरुप पाहता सदर दुरुस्ती ही किरकोळ स्वरुपाची असुन सदर दुरुस्ती करण्यास परवानगी दिल्यास दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होत नाही. तसेच प्रतिवादींना सदर दुरुस्ती केल्यानंतर त्यांची बाजु मांडण्याची संधी उपलब्ध आहे. करिता मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

<u>**आदेश**</u>

१. वादीचा निशाणी २८ चा अर्ज प्रतिवादींना रक्कम रुपये ३००/– खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीने विहित मुदतीत दुरुस्ती करावी.

(खुल्या न्यायालयात घोषित)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PRAMOD MANIK KOLSE
Date: 2024.04.05 17:48:09 +0530

**(पी.एम.कोळसे)**

दिनांक– ०४.०४.२०२४

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर (न्यायालय क्रं.१)
कन्नड

## प्रमाणपत्र

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ.निकालपत्र/आदेश यामधील सर्व मजकुर मुळ निकालपत्र/आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – | यो. सु. माळी. |
| न्यायालयाचे नांव | – | श्री. प्रमोद मा. कोळसे.<br>दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर),<br>तथा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कन्नड. |
| श्रुतलेखन दिल्याचा दिनांक | – | ०४.०४.२०२४ |
| न्यायिक अधिका–यांनी<br>निकालपत्रावर स्वाक्षरी केलेचा दिनांक | – | ०४.०४.२०२४ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | – | ०५.०४.२०२४ |

..............................................................